# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/10/2023 (सोमवार) सकाळ

---

### मौदा येथील जुगार अड्डयावर धाड
### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक ०९/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात गस्त करीत असतांना पोलीस स्टेशन मौदा हद्दीतील मौजा वडोदा शिवारातील मंगल थोटे यांचे शेता मधील खुल्या जागेत काही इसम हे तासपत्त्यांवर पैशाची बाजी लावुन अवैधरीत्या हारजीतचा जुगार खेळ खेळत असल्याचे गुप्त माहीती पथकास प्राप्त झाली. त्यावरून दिनांक ०९/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मौजा वडोदा शिवारातील मंगल थोटे यांचे शेता मधील खुल्या जागेत सापळा रचुन छापा टाकून एकुण ७ जुगारी इसम नामे —मंगेश श्रावणजी भुसारी, वय ३३ वर्ष, रा. अंबाडी केसोरी २) अतुल अशोकराव ठाकरे, वय ३२ वर्ष, रा. वार्ड नं. ०१, वडोदा ३) मयुर नागेश्वर गिरी, वय ३० वर्ष, रा. वार्ड नं. ०२, वडोदा ४) रमेश मोतीराम किरमरे, वय २१ वर्ष, रा. वार्ड नं. ०२ वडोदा ५) खुशाल भैयाराम सहारे, वय ३० वर्ष, रा. वार्ड नं. ०१, वडोदा, ६) सुरेंद्र युवराज मोटघरे, वय २८ वर्ष, रा. वार्ड नं. ०२ वडोदा ७) मंगलमूर्ती नत्थुजी थोटे, वय ३९ वर्ष, रा. वार्ड नं. १ वडोदा यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) नगदी ६२,३४०/— रू. २) दरी ५००/— रु ३) ६ मोटार सायकल किंमती ६,३५,०००/— रू व इतर साहित्य असा एकुण ६,९७,५६०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना जप्त मुद्देमालासह पोलीस ठाणे मौदा यांचे ताब्यात देण्यात आले असून त्यांचे विरूद्ध कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असुन पुढील तपास पोलीस ठाणे मौदा करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक बट्टूलाल पांडे, सहायक फौजदार नाना राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, ईकबाल शेख, संजय बानोदीया, चालक मोनू शुक्ला यांचे पथकाने केली.

### घरफोडी

**पो.स्टे. वेलतूर** :— अंतर्गत मौजा वेलतुर वार्ड क्र. ०३ येथे दिनांक ०७/१०/२०२३ चे २२.०० वा. ते ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मुकूंदा नारायण हारगुडे, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र. ३ वेलतुर ता. कुही जि. नागपूर याची पत्नी नामे— सौ. वंदना हारगुडे ही झोपेतुन उठली व किचन रूम कडे जावुन पाहीले असता तिला स्टोर रूममध्ये ठेवलेले नादुरूस्त फ्रिज मधील कपडे बाहेर आस्ताव्यस्त पडलेले दिसुन आले तेव्हा तिने फिर्यादीला झोपेतुन उठवले तेव्हा दोघांनीही गादया ठेवण्याच्या घोडोशीखाली ठेवलेले प्लॅस्टीक डब्यातील सोन्याचे दागिने पाहीले असता तेथे कोणताही डबा दिसुन आला नाही तसेच किचन रूमचा मागील दरवाजा उघडलेल्या स्थितीत आढळला व तो प्लॅस्टीक चा डबा पायरीवर पडलेला दिसला पण त्यामध्ये ठेवलेले १) सोन्याचा गोप १२ ग्रॅम कींमती ३५०००/—रू २) दोन सोन्याच्या अंगठया एक ३ ग्रॅम व दुसरी अंगठी ५ ग्रॅम दोन्हीची किंमत १२,०००/—रू ३) सोन्याचे कानातले टॉप्स दोन जोड एक ५ ग्रॅम व दुसरा ३ ग्रॅम किंमती १२०००/—रू ४) २ नग सोन्याचे नथ २.५ ग्रॅम व एक सोन्याचा खडा

०.५ ग्रॅम एकुण ३ ग्रॅम किंमती ४,५००/—रूपये व स्टील डब्यात ठेवलेले नगदी ३२००/—रू असा एकुण ६६,७००/— रूपयाचा मुद्‌देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अशोक जाधव ब. नं. १३४९ पो.स्टे. वेलतुर मो. नं. ९३५९९४७९५० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर